**महाराष्ट्र शासन**
**सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण विभाग यांचे प्रादेशिक कार्यालय, कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई-४००६१४.**
☎/ 🖷:- 022,27571580. इ-मेल - jd.mumbai@mahalfa.in

क्र.स्था.१८/ब/वलेप.पदो/२०१७-१८/वलेप-१(आस्था)/को.वि./३३० दिनांक :- ३०/०५/२०१८

**विषयः-** वरीष्ठ लेखापरीक्षक संवर्गात तात्पुरत्या पदोन्नत्या.

**-:आदेश:-**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाच्या अधिपत्याखालील कनिष्ठ लेखापरीक्षक संवर्गातील खालील कर्मचा-यांना वरीष्ठ लेखापरीक्षक संवर्गातील सुधारीत वेतन श्रेणीतील वेतन बँड रुपये ९३००-३४८०० ग्रेड वेतन रुपये ४२०० या वेतन श्रेणीतील पदावर ते ज्या दिनांकास कार्यभार धारण करतील त्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव | प्रवर्गातून निवड | सध्याचे कार्यालय | पदोन्नतीचे कार्यालय | पद रिक्त होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.व्ही.व्ही.सावंत (खुला) | खुला | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सिंधुदुर्ग | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, रत्नागिरी | श्री.दि.चिं.गिरी यांच्या बदलीने रिक्त होणा-या पदी |
| २ | श्री.प्र.म.सुर्यवंशी (अ.जा.) | खुला | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पालघर | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सिंधुदुर्ग | श्रीम.श.अ.मयेकर, वरिष्ठ लेखापरीक्षक यांची मविलेसे गटात पदोन्नतीमुळे झालेल्या रिक्त पदी |
| ३ | श्रीम.यो.वा.विसपुते (इमाव) | खुला | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण विभाग, नवी मुंबई | संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई | श्री.सु.शं.जाधव, वरिष्ठ लेखापरीक्षक यांची मविलेसे गटात पदोन्नतीमुळे झालेल्या रिक्त पदी |
| ४ | श्री.सु.रा.शेडगे (खुला) | खुला | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, ठाणे | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सिंधुदुर्ग | श्री.सं.द.पाटील, वरिष्ठ लेखापरीक्षक यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीमुळे झालेल्या रिक्त पदी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.क.रा.बाकडे (विमाप्र) | खुला | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, ठाणे | संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई | श्री.र.पा.वेखंडे, वरिष्ठ लेखापरीक्षक यांच्या दि.३१/०५/२०१८ रोजी सेवा निवृत्तीने होणा-या रिक्त पदी |

सदर पदोन्नती मा.सर्वोच न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि /१६ब यांनी दि.२९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार देण्यात येत आहे.

वरील कर्मचा-यांना या आदेशान्वये देण्यात येणारी पदोन्नती ही दिनांक ०१.०१.२०१८ च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीवरील ज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहे.

वरील कर्मचा-यांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.वीएवाय १०८८/सीआर ११०० (एक)/एसईआर-३ दिनांक ०६.११.१९८४ नुसार वेतननिश्चितीचा विकल्प द्यावयाचा असल्यास, तो त्यांनी पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम-११ (ए) खालील तरतूदीनुसार करण्यात येईल.

उपरोक्त पदावर हजर होण्यापुर्वीच्या आस्थापनेवरील विद्यमान अथवा प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशीच्या अहवालाच्या तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणाच्या अहवालाच्या अधिन राहून किंवा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये दिलेल्या निर्णयाच्या अधिन राहून वरील शासकीय कर्मचा-यांना गट क मधील वरीष्ठ लेखापरीक्षक संवर्गातील पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.एसआरव्ही२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि.१२/०९/२०१६ अन्वये एकदा पदोन्नती नाकारली तर पुढील २ वर्षाच्या निवड सुचित नाव घेण्यात येणार नाही.

वरील कर्मचा-यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क.एसआरव्ही. १०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ०८.०६.१९९५ अथवा शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन १०९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २०.०७.२००२ नुसार त्यांच्या बारा वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरीष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला असल्यास त्यांना देण्यात आलेली पदोन्नती त्यांनी नाकारल्यास त्यांना या आदेशाच्या दिनांकापासून वरीलप्रमाणे लाभ देण्याचे बंद करावे व त्याबाबतची माहिती या कार्यालयास कळवावी.

वरील कर्मचा-यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत हजर होऊन त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत रुजू अहवाल या कार्यालयास सादर करावा. विहीत कालावधीत हजर न झाल्यास त्यांना ही पदोन्नती स्विकारण्यास स्वारस्य नाही असे समजून त्यांचे पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. पदोन्नतीच्या पदावर हजर होण्याकरीता मुदतवाढीसाठी त्यांनी कोणत्याही कारणास्तव पत्रव्यवहार करु नये.

D:/,Aarti,2018,Zagde madam,badly,Paddonati-Kalbadh2018,Orders